असा. क्र. ७७–७८

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीजाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मार्च ६, १९९७/फाल्गुन १५, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार–ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मार्च १९९७

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक जीपीएन. १०९६/सीआर-१८१/२१-अे.—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम तीन) याच्या कलम १२४ चे पोट-कलम (१) व कलम १७६ चे पोट-कलम (२) मधील खंड (सव्वीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व शुल्क नियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम १७६ च्या पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व शुल्क (सुधारणा) नियम, १९९७ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व शुल्क नियम, १९६० चे नियम ८० (यात यापुढे याचा उल्लेख "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) मधील पोट-नियम (१) नंतर खालील पोट-नियमाचा समावेश करण्यात येईल :—

"(१-अ) सर्वसाधारण पाणीपट्टी ही नियम १८ खालील इमारत करासोबत वसूल करण्यात येईल."



Scanned by CamScanner

३. मुख्य नियमांच्या नियम ९८ मधील पोट-नियम (२) नंतर खालील पोट-नियमाचा समावेश करण्यात येईल :—

"(अ) २० मिलीमीटर (३/४ इंच) व्यासाच्या पाण्याच्या नळाची जोडणी फक्त सार्वजनिक व व्यापारी संस्थांना अनुज्ञेय राहील."

४. मुख्य नियमास जोडलेल्या भाग-१२ मधील अनुसूची ऐवजी खालील अनुसूचीचा समावेश करण्यात येईल :—

## अनुसूची

(नियम १०१ पहावा)

१. भाग अ.—मीटर पद्धती व्यतिरिक्त इतर पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या पाण्याबाबत.—

| मोजमाप यंत्रविरहित घरगुती वापरासाठी | किमान | कमाल |
|---|---|---|
| (१) १२ मिलीमीटर (१/२ इंच) व्यासाच्या नळ जोडणी-करिता. | प्रतिवर्षी रु. ३६० | प्रतिवर्षी रु. ४५० |
| (२) २० मिलीमीटर (३/४ इंच) व्यासाच्या नळ जोडणी-करिता. | प्रतिवर्षी रु. ७२० | प्रतिवर्षी रु. १,००० |

मोजमाप यंत्रविरहित बिगर घरगुती वापरासाठी.—मोजमाप यंत्रविरहित बिगर घरगुती वापरासाठी पाण्याचे दर हे मोजमाप यंत्रविरहित घरगुती वापरासाठी असलेल्या पाण्याच्या दरापेक्षा दुप्पट राहतील.

२. भाग ब.—मोजमाप यंत्राद्वारे पाणीपुरवठा दर—

| | दर |
|---|---|
| घरगुती वापरासाठी | |
| (१) प्रत्येक १,००० लिटर्स किंवा त्याचा भाग | .. रु. १.२५ अधिक १० पैसे अधिभार. |
| बिगर घरगुती वापरासाठी | |
| (२) प्रत्येकी १,००० लिटर्स किंवा त्याचा भाग. | .. रु. २.५० अधिक २० पैसे अधिभार. |

३. भाग क.—खाजगी नळ जोडणी फी (शुल्क)—

| | |
|---|---|
| (१) १२ मिलीमीटर (१/२ इंच) व्यासाची नळ जोडणी | .. रु. ७५ |
| (२) २० मिलीमीटर (३/४ इंच) व्यासाची नळ जोडणी | .. रु. १२० |

४. भाग ड.—ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या आधारे खाजगी नळ जोडणीसाठी अनामत रकमा—

| | |
|---|---|
| (१) घरगुती वापरासाठी | .. रु. ५०० ते रु. १,००० |
| (२) बिगर घरगुती वापरासाठी | .. रु. १,००० ते रु. २,५०० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. का. पवार,

शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner